# प्रेसनोट

दि. १८/१०/२०२३

**दौंड नगरपरिषद, जिल्हा पुणे येथील प्रधानमंत्री आवास योजना अभियंता व प्रकल्प सल्लागार अभियंता यांचेवर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | दौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, १२. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ५२ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) विजय दिगंबर नाळे, वय २७ वर्ष, पद- प्रधानमंत्री आवास योजना अभियंता (वर्ग-३),<br>२) प्रशांत मधुकर जगताप, वय ३१ वर्ष, पद- प्रकल्प सल्लागार अभियंता, दोघे नेमणुक - दौंड नगरपरिषद, जिल्हा - पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ३०,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १०,०००/- रुपये (दहा हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | ३१/०८/२०२३ व दि. ०७/०९/२०२३ |
| सापळा दिनांक | १८/१०/२०२३ |

ठिकाण :- दौड नगरपरिषदेच्या कार्यालयामध्ये

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या प्रधानमंत्री आवास योजगे अंतर्गत मंजूर घरकुलाच्या उर्वरित रक्कमेचा चेक काढण्यासाठी लोकसेवक विजय नाळे यांनी ५०,०००/- रुपयाची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक विजय नाळे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या मंजूर घरकुलाच्या उर्वरित रक्कमेचा चेक काढण्यासाठी ३०,०००/- रुपये लाचेची पंचासमक्ष मागणी करुन, अॅडव्हॉन्स म्हणून १०,०००/- रुपये (दहा हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. तसेच लोकसेवक क्र. २ प्रशांत जगताप यांनी लोकसेवक विजय नाळे यांच्या लाच मागणीस दुजोरा देऊन लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन दिले म्हणून त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध दौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विरनाथ माने तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.